महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहत जवळ, विद्दयानगर, मिरज- ४१६४१०

दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३)२२३१४२३ फॅक्स -(०२३३) २२३१२६९

संकेत स्थळ - www.gpmiraj.ac.in email - gpmiraj@gmail.com

---

जा.क्र.शातंनिमि विवि/हिप2020/ 328 दिनांक :- 6 FEB 2021

**परिपत्रक**

विषय : हिवाळी परीक्षा - 2020 करीता परीक्षा अर्ज भरणेकरीता विशेष तरतूदीबाबत...

संदर्भ : मा. सचिव, मरातंशिमं मुंबई यांचे परिपत्रक क्र. MSBTE/D-40/Exam Form/W-2020/022 दि.04.02.2021

उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरुन, संस्थेतील प्रवेशित सर्व विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, हिवाळी परीक्षा 2020 करीता ज्या विदयार्थ्यांनी त्यांची नोंदणी सन 2020 पूर्वी केली होती त्यांना परीक्षा अर्ज भरण्याची मुदत दि.16.01.2021 पर्यंत तसेच ज्या विदयार्थ्यांनी त्यांची नोंदणी 2020 - 21 या वर्षात केलेली आहे त्यांना दि.03.02.2021 पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

मा. सचिव, मा. सचिव, मरातंशिमं मुंबई यांनी त्यांचे संदर्भीय परिपत्रकान्वये दि.08.02.2021 पर्यंत कांही अटींच्या अधिन राहून हिवाळी परीक्षा 2020 करीता विशेष तरतूदीन्वये दि.05.02.2021 ते दि. 08.02.2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सबब ज्या विदयार्थ्यांनी अदयाप त्यांचे हिवाळी परीक्षा 2020 चे परीक्षा अर्ज भरलेले नाहीत त्यांनी त्यांचे परीक्षेचे अर्ज दि.08.02.2021 पूर्वी विदयार्थी लॉगीन मधून भरावेत. तसेच भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या शुल्कासह संस्थेत विहीत वेळेत जमा करावी. अन्यथा होणाऱ्या नुकसानीस विदयार्थी स्वत: जबाबदार राहील.

1. प्रत्येकी परीक्षा अर्जास रु.1500/- इतकी दंडाची रक्कम + परीक्षा शुल्क म्हणून भरावे लागेल.
2. सदरहू रक्कम विदयार्थी ऑनलाईन अथवा पारंपारिक पदधतीने संस्थेत जमा करु शकेल.
3. विदयार्थ्यांनी त्याचा हिवाळी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या प्रश्न पत्रिकेच्या कोड हिवाळी परीक्षा 2020 च्या वेळापत्रकाप्रमाणे नमूद केला असल्याचे खात्री करावी.

(कॅप्टन नि. पां. सोनजे )
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
मिरज.

प्रत - 1. सर्व विभाग प्रमुख / प्रभारी अधिकारी (सर्व), शासकीय तंत्रनिकेतन, मिरज यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
2. मुख्य सूचना फलक. 3. वसतीगृह